# वाईल्ड कॅम्पच्या... वॉटरकुल्ड रुम्स

मनुष्य आणि निसर्ग यांचं नातं अगदी पूर्वापारपासूनचं. हे नातं अगदी कायमस्वरूपी, अतूट आणि म्हणूनच हा निसर्ग जपणं हे आपल्या प्रत्येकाचं नकळत कर्तव्यच आहे. भौगोलिक रचनेमुळे निसर्गाचे स्वरूप वेगवेगळ्या भागात बदललेलं दिसतं, कुठे घनदाट वनराई, कुठे डोंगररांगाच, कुठे समुद्र, कुठे लख्ख सूर्यप्रकाश, कुठे थंडीमुळे सूर्याचा अभाव पण हीच तर खरी गंमत आहे. मनुष्याच्या निरनिराळ्या स्वभावांसारखा हा निसर्ग पण निरनिराळा.

पण हल्लीच्या आधुनिकतेमुळे पूर्वीचा साधा-सुंदर निसर्गही आता बदलत चालला आहे आणि पर्यावरणातल्या या बदलांमुळे निसर्गाची ती निरागसताही बदलत चालली आहे. आज आपल्याला टीव्ही, फ्रीज, मायक्रोवेव्ह, वॉशिंग मशीन, मिक्सर, पंखा तर सोडाच एसी शिवायही सोसावत नाही. कधी विचार केला आहे आपण की, पूर्वीही या गोष्टी नव्हत्या पण तरीही माणसं मजेत जगत होतीच ना? आपल्याला हा साधा व सुंदर निसर्ग जसा आहे तसा अनुभवता यावा व त्याबरोबरीने त्याची मजाही लुटता यावी यासाठी डॉ. जितेंद्र खेर यांनी त्यांच्या वाइल्ड कॅम्प रिसॉर्टमध्ये एक आगळीवेगळी वॉटरकुल्ड रुम्सची संकल्पना आणली आहे आणि ही संकल्पना अनुभवल्याशिवाय तुम्हाला त्याची गंमत समजणार



वाईल्ड कॅम्पमधील कॉटेजेस

नाही. कोणत्याही रुम्समध्ये जाणीवपूर्वक एसीचा वापर केलेला नाही. तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना, मित्रांना तुमचा वेळ एकत्र मिळावा यासाठी मुद्दामून टीव्ही देखील ठेवलेले नाहीत आणि खरंच यामुळे तुमची सुट्टी तुम्हाला निश्चितच रिलॅक्स करते.

पाण्याच्या होणाऱ्या अलगद फवाऱ्यांनी रूम्समध्ये एक सुखद गारवा तुम्ही अनुभवता. जरी नावाप्रमाणे साजेसं नेचर रिसॉर्ट असलं तरीही हे इतर आधुनिक सोयींनी सुसज्ज आहे. रिसॉर्टमध्ये राहण्यासाठी, सुपिरियर कॉटेजेस, कॉटेजेस व मोठ्या ग्रुप्ससाठी डॉरमेटरीज आहेत.

मुंबई व नाशिकपासून वाईल्ड कॅम्प अगदी जवळच्या अंतरावर आहे. रिसॉर्टमध्ये २ स्विमिंग पूल्स, रेन डान्स, इन्डोर-आऊटडोर गेम्स, किड्स प्ले एरिया, ओपन एअर जीम तुमच्या करमणुकीसाठी आहेत. शिवाय रात्रीच्या वेळेची नाईट सफारी ही एक वेगळा अनुभव देते. कॅम्पफायरची मजा घेत घेत व नंतर स्वादीष्ट शाकाहारी व मांसाहारी जेवणाची लज्जत घेत तुम्ही जेव्हा या वॉटरकुल्ड रूम्समध्ये झोपण्यास जाल तेव्हा एक सुंदर दिवस उपभोगल्याचे समाधान तुम्हाला इथे नक्कीच मिळेल.



डॉ. जितेंद्र खेर

शांत निवांत जागा, आपल्या जवळच्या व्यक्तींचा सुखद सहवास, गप्पागोष्टी व निसर्गाशी एकरूप करणाऱ्या वॉटरकुल्ड रुम्स. चला तर मग एक वेगळा थंडावा अनुभवायला.

अधिक माहितीसाठी संपर्क

०२२-२५४५१२३४ / ९२२४५८६०६०

www.wildcamp.in